ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ पुणें, बुधवार तारीख २२ ऑक्टोबर, १९५८ अंक ४३

## विविध माहिती

**पिकांचें जबर नुकसान**—गेल्या कांहीं दिवसांत पंजाबमध्यें बऱ्याच भागांत पावसाच्या जोरदार सरी पडून अतिवृष्टि झाली. अतिवृष्टीमुळें पिकांचें ३३ कोटी रुपये किंमतीचें नुकसान झालें असावें असा अंदाज राज्याच्या महसूलमंत्र्यांनीं केला आहे. पंजाब सरकारनें तगाई कर्जें, घरबांधणी इत्यादि कामासाठी ६० लाख रुपये मंजूर केले आहेत.

**हिंदी मजुरांची परत पाठवणी**—मलायांतील रबराच्या मळ्यांत काम करणाऱ्या ११०० हिंदी मजुरांना पुढील महिन्यांत भारताला परत पाठविण्यांत येणार आहे. हे मजूर १९२९–३० च्या सुमारास तिकडे गेले होते. आतां ते अशक्त झालेले अगर फार वृद्ध झालेले असल्यानें त्यांच्याचानें मळ्यावरील काम होत नाहीं. बहुतेक जणांनीं आपली हयात मलायांत काढलेली आहे.

**पृथ्वीचे आणखी उपग्रह**—ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, इटली इत्यादि पश्चिम युरोपांतील देश लवकरच पृथ्वीभोंवतीं फिरणारे आपआपले उपग्रह अंतराळांत सोडूं शकतील. उपग्रहांना अंतराळांत फेकण्यासाठी लागणारे अग्निबाण अमेरिकेकडून मिळणार आहेत.ह्या संबंधीची योजना आतां बरीच प्रगत झाली आहे असें एका अमेरिकन शास्त्रज्ञानें जाहीर केलें आहे.

**बंगलोरच्या संस्थेला मदत**—बंगलोर येथील इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स ह्या संस्थेला राष्ट्राध्यक्ष बाबू राजेंद्र प्रसाद ह्यांनीं १९५८–६३ ह्या कालासाठी ३७ लाख रुपयांची मदत देण्यास मंजुरी दिली आहे. पुढील वर्षाच्या फेब्रुआरी महिन्यांत राष्ट्राध्यक्षांच्या हस्तें संस्थेचा सुवर्णमहोत्सव साजरा करण्यांत येणार आहे.

**सीलोनी कामगारांचें शिक्षण**—सीलोनचें सरकार व पश्चिम जर्मनीचें सरकार ह्यांच्यांत कोलंबो येथें बसेस तयार करण्याचा कारखाना काढण्याचा करार झाला आहे. कारखान्यासाठी लागणाऱ्या कामगारांना शिक्षण देण्याची सोयहि करण्याचें पश्चिम जर्मन सरकारनें कबूल केलें आहे.

**मुंबई राज्यांतील हिंवताप**—मुंबई सरकारनें १९४६ सालीं मलेरिआचें उच्चाटन करण्याची मोहीम सुरू केली होती. ती १९६५ अखेर पुरी होईल. ह्या मोहिमेसाठी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत ३६२ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. मात्र जंतुघ्न रसायनें व त्यांचे फवारे उडविण्याचीं साधनें मध्यवर्ती सरकारकडून विनामूल्य पुरविण्यांत येत आहेत.

**विजापूर येथील प्रेक्षणीय स्थळें**—विजापूर येथील प्रेक्षणीय स्थळें पहाण्यास येणारांची सोय व्हावी म्हणून तेथें दोन नवीन विश्रांति-स्थानें बांधण्यांत येणार आहेत. त्यांपैकी एकांत परदेशीय प्रवाशांसाठी खास सोयी करण्यांत येतील. विजापूर येथें गोलघुमट व इब्राहिम रोझा ह्या दोन जुन्या इमारती विशेष पहाण्यासारख्या आहेत.

**ओरिसांत मुबलक तांदूळ**—ओरिसा राज्यांत तांदुळाचें पीक मुबलक प्रमाणांत हातीं येण्याची खात्री वाटल्यामुळें राज्य-सरकारनें आपल्याजवळील २९,००० टन शिलकी तांदूळ विकण्यास प्रारंभ केला आहे. ५,००० टन तांदूळ पश्चिम बंगाल सरकारला विकण्यांत आला असून आणखी १०,००० टन तांदूळ खुल्या बाजारांतून पुरविण्याची तयारी दाखविण्यांत आली आहे.

**भारी यंत्रसामुग्रीचे कारखाने**—रांची येथें स्थापन करण्यांत येणारा भारी यंत्रसामुग्रीचा कारखाना व ओतकामाची भट्टी आणि दुर्गापूर येथील खाणींची यंत्रसामुग्री बनविणारा कारखाना चालविण्यासाठी मध्यवर्ती सरकार एका कॉर्पोरेशनची स्थापना करणार आहे. कॉर्पोरेशनचें भांडवल ५० कोटी रुपये राहील.

**ओखा बंदराजवळ नवें दीपगृह**—सौराष्ट्रामधील ओखा बंदराजवळ एक नवीन दीपगृह बांधण्यास ह्यासंबंधीच्या सल्लागार समितीनें मंजुरी दिली आहे. दीपगृह बांधण्यासाठी ८० लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. दीपगृहाच्या प्रकाशाचा झोत धुक्याच्या हवेंतहि १७ मैलपर्यंत मार्गदर्शन करूं शकेल. त्याच्या भोंग्याचा आवाज १० मैल ऐकूं जाईल.

**आयुर्वेदीय संशोधनशाळा**—नांदेड येथें एक आयुर्वेदीय संशोधनशाळा स्थापन करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. ह्या कामासाठी २ लाख रुपये खर्च येणार आहे. संशोधनशाळा व इस्पितळ ह्यांच्या इमारती बांधण्यासाठी सरकारनें १२ एकर जमीन खरेदी केली आहे. इस्पितळांतील नोकरांसाठी राहण्याची सोयहि करण्यांत येणार आहे.

**इराकला इंजिनिअर्स पाहिजेत**—मध्यवर्ती पाणी व वीज कमिशनचे अध्यक्ष गेल्या महिन्यांत इराकला गेले असतांना इराकच्या सरकारनें कांहीं भारतीय एंजिनिअर्स व कंत्राटदार ह्यांना इराकमध्यें पाठविण्याची विनंती केली. इराकमध्यें चालू असलेल्या विकासाच्या कामावर देखरेख करण्यासाठी त्यांची गरज आहे.

**पुष्पक विमान**—दिल्ली येथें भरविण्यांत आलेल्या राष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शनांत बंगलोर येथील हिंदुस्थान एअरक्रॅफ्ट कारखान्यानें बनविलेलें पुष्पक विमान ठेवण्यांत आलें आहे. हें विमान वजनाला हलकें असून त्याला अवघा २०,००० रुपये खर्च येईल. संरक्षणाच्या कामीं तें चांगलें उपयुक्त ठरेल, असें सांगण्यांत येत आहे.

## निर्गत वाढीच्या डोकेंदुखीचें खरें कारण

भारताच्या निर्गतींत वाढ होत नाहीं, ह्या डोकेंदुखीची कल्पना खालील आंकड्यांवरून येईल:—

( आंकडे कोटी रुपयांचे )

| १९५८ | आयात | निर्गत | व्यापारांतील तफावत. |
|---|---|---|---|
| जानेवारी | ६६·०५ | ५३·२४ | –१२·८१ |
| फेब्रुवारी | ६६·२१ | ४१·  ९ | –२४·२९ |
| मार्च | ७०·६० | ४६·७३ | –२३·८७ |
| एप्रिल | ५९·९८ | ४१·७३ | –१८·२५ |
| मे | ६३·२९ | ४४·७१ | –१८·५८ |
| जून | ६३·९३ | २८·१२ | –३५·८१ |
| जुलै | ६६·९६ | ५४·३१ | –१२·६५ |
| एकूण | ४५६·०२ | ३१०·७६ | –१४७·२६ |

१९५७ च्या पहिल्या सात महिन्यांच्या मानानें १९५८ च्या पहिल्या सात महिन्यांत भारताची निर्गत ५८ कोटी रुपयांनीं कमी झाली. परदेशांतील उतरलेले बाजारभाव, स्पर्धेंत वाढ, निर्गत चहाच्या मिळकतींत घट, इत्यादींमुळें निर्गतीवर प्रतिकूल परिणाम झाला. निर्गतीला जो माल उपलब्ध व्हावयाचा, तो भारताच्या वाढत्या लोकसंख्येला पुरविण्यासाठीं येथेंच खपून जातो. त्यामुळें, उत्पादन वाढलें तरी निर्गतीस तें उपलब्ध कसें होणार ?

---

## भारतांतील औद्योगिक उत्पादनाचे इंडेक्स नंबर

औद्योगिक उत्पादनाच्या १९५१ = १०० ह्या हिशोबानें सर्व-साधारण इंडेक्स नंबरानें उच्चांक ( १६८·६ ) जून १९५७ मध्यें गाठला. ऑगस्ट १९५७ मध्यें तो १४२ वर घसरला, ऑक्टोबर १९५७ मध्यें १३४·९ झाला आणि वर्षअखेर १४२·१ झाला. जानेवारी, १९५८ ते मे १९५८ पर्यंतचे इंडेक्स नंबर खालीं दिले आहेत.

| १९५८ | इंडेक्स नंबर |
|---|---|
| जानेवारी | १४५·१ |
| फेब्रुवारी | १४५·२ |
| मार्च | १३८·८ |
| एप्रिल | १३९·८ |
| मे | १४१·० |

---

## ' क्ष ' किरण साहित्याचें उत्पादन :
## तीन फर्म्स अमेरिकन, जर्मन व फ्रेंच सहकार्य घेणार

१९५६—५७ मध्यें भारतानें ६० लक्ष रु. किंमतीचें ' क्ष ' किरण साहित्य आयात केलें. येत्या पांच वर्षांत त्याची वार्षिक मागणी ७५ ते ८० लक्ष रुपयांवर जाईल, अशी अपेक्षा आहे. ह्या साहित्याचें भारतांत उत्पादन करण्यासाठीं तीन योजना भारत सरकारनें मंजूर केल्या आहेत. प्रत्येकीची उत्पादनक्षमता ३० लक्ष रु. किंमतीच्या साहित्याच्या निर्मितीची राहील. निर्मिति करणाऱ्या फर्म्स दिल्ली, मुंबई व कलकत्ता येथें आहेत. दिल्लीची फर्म पतियाळा किंवा फरिदाबाद येथें अमेरिकन फर्मच्या मदतीनें कारखाना सुरू करील. मुंबईची फर्म वरळी येथें पश्चिम जर्मन फर्मच्या साहाय्यानें कारखाना काढील. कलकत्ता येथील फर्म फ्रेंच फर्मचें सहकार्य घेईल.


भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८५,५०० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. श्री. चं. रा. राठी.

श्री. गो. वा. देवी श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.


★ होतकरू संसारी तरुण–तरुणींसाठी ★

श्री. वा. काळे ह्यांचें मार्गदर्शक हितगुज

| | |
|---|---|
| कण आणि क्षण | रु. २=५० |
| पुढे पाऊल | रु. २=०० |
| तुमचें स्थान कोणतें ? | रु. २=०० |

ह्या यशस्वी पुस्तकांची भेट देऊन तुमचें शुभचिंतन प्रभावी करा !

—अभिनव पुस्तकमंदिर, पुणें ४.—



किर्लोस्कर

इलेक्ट्रिक पंपिंग सेट

यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकावू.

आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.

सविस्तर माहितीसाठीं लिहा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी, द. सातारा

# अर्थ

बुधवार, ता. २१ ऑक्टोबर, १९५८



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रेल्वे-मार्गाच्या बाजूच्या जमिनींची लागवड

सध्यांच्या अन्नधान्याच्या टंचाईच्या दिवसांत पडीक जमीन लागवडीखाली आणण्याचा उपाय नेहमींच सुचविला जातो. पडीक जमीन लागवडीखाली आणण्याचे प्रयत्नहि होत आहेत. भारतामधील रेल्वेकडे अशा प्रकारची ५ लाख एकर जमीन आहे. भारतामधील ३५,००० मैल लांबीच्या रेल्वेमार्गाच्या कडेनें ही जमीन आहे. सुमारें ५,३०,००० एकर जमिनींपैकी सर्वच जमीन लागवडीला आणण्यासारखी नसून फक्त ५६,००० एकर जमिनींतच पीक घेणें शक्य आहे. त्यांपैकी ३०,००० एकर जमीन शेतकऱ्यांना कसण्यास दिलेली आहे, असें रेल्वे-बोर्डाचें म्हणणें आहे. रेल्वे-मार्गाच्या दोन्ही बाजूला असलेली जमीन धरून ह्या पट्ट्याची सरासरी रुंदी १२९ फूट आहे. इतकी रुंदी रेल्वे-मार्ग नीट दुरुस्त ठेवण्यासाठी व इतर तांत्रिक कारणासाठी आवश्यक आहे असें सांगण्यांत येतें. रेल्वेचा मार्ग दुहेरी करण्यासाठीहि ह्या रुंदीचा प्रसंगीं उपयोग होतो. रेल्वे एंजिनांतून उडणाऱ्या ठिणग्यांमुळें कडेच्या शेतांतून आग लागण्याचा संभव असतो, म्हणून रेल्वे-मार्गापासून कांहीं अंतरापर्यंतच जमिनीची लागवड करतां येते. पण जपानमध्यें रेल्वे-मार्गाच्या कडेला कांहीं फुटांपर्यंतसुद्धां लागवड करण्यांत येतें, तें कसें असा प्रश्न उद्भवतो. रेल्वे-मार्गाच्या कडेला असणारी जमीन राज्य-सरकाराच्या मार्फत कसण्यास दिली जाते. कसणाऱ्यांना लांब मुदतीचा भाडेपट्टा करून देण्यांत येतो. पण त्या जमिनीवर कुळांना हक्क सांगतां येऊं नये, अशी तजवीज केलेली आहे.

---

## सर्वोदय तत्त्वज्ञानाचें शंकास्पद भवितव्य

आचार्य विनोबाजी भावे ह्यांनीं भूदानाची चळवळ सुरू केल्यावर त्यांतूनच पुढें ग्रामदानाच्या कल्पनेचा उदय झाला. ग्रामदानाच्या कल्पनेला पहिलें मूर्त स्वरूप ओरिसांतील कोरापुट ह्या गांवच्या लोकांनीं दिलें. तेव्हांपासून भूदानाच्या चळवळीला आणखीच जोर चढला. परंतु ग्रामदानांत मिळालेल्या ग्रामांचा कारभार चालविण्याच्या यंत्रणेची उभारणी नीट करतां येत नाहीं असा अनुभव येत आहे. श्री. एस्. जी. माजगांवकर ह्या सर्वोदयी कार्यकर्त्यानें 'ग्रामदानाची प्रयोगभूमि' ह्या नांवाची एक पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. श्री. माजगांवकर हे कोरापुट-मधील परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी मुद्दाम तेथें गेले होते. त्यांना कोरापुट येथील व्यवस्थेसंबंधीं तीव्र निराशा वाटली. ह्या गांवांतील विकासाच्या कामांत सरकारी राज्ययंत्रणेचा प्रभाव अधिकाधिक प्रमाणांत पडत आहे. सर्वोदयी तत्त्वज्ञानांतील निःशासन समाजव्यवस्थेशीं हें अर्थातच विसंगत आहे. ग्रामदान चळवळीबद्दल अतीव कौतुक वाटत असतांनाहि त्यांना हा अभिप्राय व्यक्त करावा लागला. कोरापुटमध्यें जमिनीचें योग्य वांटप त्यांना आढळून आलें नाहीं; किंवा तेथील लोकांत सामाजिक जाणिवेचीं फारशीं चिन्हेंहि दिसून आलीं नाहींत इतकेंच काय, पण गांवाची व्यवस्था पाहण्यासाठी लोकांच्या प्रतिनिधींची संघटनाहि उभारलेली दिसली नाहीं. पण सगळ्यांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे ग्रामदानांत आपल्या जमिनी देणाऱ्यांत विकासासाठी सरकारी मदत मिळविण्याची आशा बाळगणारेच लोक अधिक होते! खुद्द ग्रामदान कार्यकर्त्यांतच ह्या चळवळीच्या मूलभूत तत्त्वाविषयीं स्पष्ट विचार नसल्यामुळें ही परिस्थिति उद्भवली आहे, असें त्यांचें मत आहे.

---

## तेलाच्या शोधाच्या प्रयत्नांची वाटचाल

खंबायतजवळील लुनेज ह्या खेड्यांत तेलाचा सांठा मोठ्या प्रमाणावर सांपडल्याचें वृत्त पसरल्यापासून लोकांत औत्सुक्याची भावना वाढीला लागली आहे. खंबायतच्या आखाताच्या भागांत आणखी कांहीं विहिरी खोदण्याचें काम लवकरच सुरू होणार असल्याचें कळतें. खुद्द लुनेज येथील विहीर अधिक खोल करण्याचें काम चालू असून आतां तेथें पक्का खडक लागल्याचें वृत्त आहे. हा खडक फोडल्यावर ह्या भागांतील तेलाच्या मुख्य सांठ्यापर्यंत खोदाई पोहोंचेल, असें तज्ज्ञांचें मत आहे. मग त्यानंतर विहीर आणखी खोल करण्याचें कारण पडणार नाहीं. 'तेल आणि नैसर्गिक गॅस कमिशन'चे वरिष्ठ अधिकारी लुनेज येथें आले होते. त्यांनीं तेलाच्या शोधाची व्याप्ति वाढविण्याचें ठरविलें आहे. भूगर्भशास्त्रज्ञांच्या मतानें मध्य गुजरातमधील साबरमती ते माही ह्या नद्यांमधील २४ मैलांचा पट्टा हा तेलानें समृद्ध आहे. अर्थातच ह्या भागांत खोदाई करण्यांत आल्यास भरपूर तेल सांपडेल असें त्यांना वाटतें. ह्या भूभागाचे नकाशे आता तयार करण्यांत आले आहेत. त्यांच्या मतानें लुनेजच्या आसपासच्या ९ मैलांच्या परिसरांत तर तेल मुबलकच आहे. लुनेज येथील विहिरीचें खोदकाम चालूं असतां ८ सप्टेंबर रोजीं प्रथम तेल आढळून आलें. त्यावेळीं विहिरीची खोली ६,५७२ फूट होती व दर तासाला ७६,००० गॅलन ह्या प्रमाणांत तेल तीमधून बाहेर पडत होतें. तेलाचा भूमिगत सांठा खंबायतच्या आखातांत पसरला असावा असा अंदाज आहे. आखाताची ७ मैलांपर्यंतची खोली अवघी तीस फूट आहे. ह्या खोलीवरील खडकांची पहाणी पुरी करण्यांत आली आहे. आणखी पहाणी करण्यांत येत असून खुद्द आखातांत पाण्याच्या खालीहि एखादी विहीर खोदण्यांत येण्याचा संभव आहे.

---

**"अर्था"चा दिवाळी अंक**

**दिवाळीचे आधींच वाचकांच्या हातीं पडेल.**

**दि. २९ ऑक्टोबरचा अंक बंद राहील**

## माणसें जगविण्यानें कार्य संपणार नाहीं

### राष्ट्रीय उत्पादनास हातभार लावणारी प्रजा हवी

अन्नप्रश्नाइतकाच लोकसंख्येच्या वाढीचा प्रश्न गंभीर आहे. दुबळ्या, निरुपयोगी, कसेंबसें जगणाऱ्या लोकांची संख्या वाढत आहे. अशा लोकांना नाममात्र जिवंत ठेवण्यानें आपलें कार्य संपत नाहीं. त्यांना सुदृढ करून त्यांचा उपयोग कसा करून घेतां येईल याचा विचार झाला पाहिजे.

बेल्जममधील 'हॉस्पिटल दि बव्हेरी 'मध्यें ७० वर्षांच्या एका स्त्रीला तेथील डॉक्टरांनीं जवळ जवळ कृत्रिमपणेंच १७ महिने जिवंत ठेवली होती. हा सर्व काळ ती बेशुद्धावस्थेंत असून तिला बळजबरीनें अन्न घालावें लागे व तिचा कोठा साफ करावा लागे. लिएज येथें जेरॉंटॉलॉजीची (प्राणिमात्रावर वार्धक्याच्या होणाऱ्या परिणामांच्या अभ्यासाचें शास्त्र) पहिली आंतरराष्ट्रीय परिषद जेव्हां भरली, तेव्हां तिचेमध्यें भाषण करतांना बेल्जमचा एक प्रमुख धन्वंतरी, डॉ. रॉक्सम ह्यांनीं वरील स्त्रीचें उदाहरण देऊन जे रोगी बरे होण्याजोगे नसतील अशांचें, विशेषतः अगदीं कसें-बसें जिवंत असणाऱ्या म्हाताऱ्या लोकांचें आयुष्य डॉक्टरांनीं कृत्रिमपणें बळेंच वाढवूं नये, असें प्रतिपादन केलें. संपन्न देशांत माणसांची आयुर्मर्यादा वाढत आहे. त्यामुळें म्हाताऱ्याकोताऱ्यांची संख्याहि फुगत आहे. त्या कारणानें त्यांच्या आजारीपणाचा प्रश्न बिकट होऊन बसला आहे. तरुण व सत्वर बऱ्या होण्या-जोग्या आजाऱ्यांना इस्पितळांत खाटा मिळूं शकत नाहींत. त्या खाटा हजारों 'होपलेस' केसेसनीं अडवून ठेवलेल्या आहेत, अशी डॉ. रॉक्सम ह्यांनीं तक्रार केली. अशांना मरण ओढवणारें औषध द्यावें, असें त्यांचें म्हणणें नाहीं. परंतु, ज्यांना स्वतःच्या जिवंतपणाचीहि जाणीव नाहीं, अशा नाममात्र संजीव प्राण्यांना जिवंत राखण्याचा समाजानें आग्रह धरणें हा निवळ भोंदूपणा आहे, असें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे. स्वतःच्या शारीरिक सामर्थ्यानें ज्यांचा जीव टिकणें शक्य नाहीं, अशांचे हाल वाढ-विण्यांत काय अर्थ आहे ? वार्धक्यामुळें माणसांचीं इंद्रियें क्षीण होतात, त्यांना पूर्वस्थितीवर आणणें शोधांच्या योगानें कांहीं काळानंतर शक्य होईल, असें मात्र त्यांनीं सांगितलें.

### जिवंतपणीं मरणाच्या यातना

डॉ. रॉक्सम ह्यांनीं वृद्धांचा जीव कसाबसा राखण्याचा खटाटोप समाजहितास पोषक होणारा नाहीं असें प्रतिपादन केलें आहे. तोच सिद्धांत सर्वसाधारण हिंदी जनतेस लावला तर आपणांस काय आढळतें ? इंग्रजांचें येथें राज्य सुरू झाल्यावर त्यांनीं आधुनिक शोधांच्या साहाय्यानें देवीच्या सांथीचा प्रतिबंध केला, प्लेग हटविला, मलेरिया कमी केला, कॉलऱ्याविरुद्ध उपाय योजले, बालमृत्यु आटोक्यांत आणण्याचा प्रयत्न केला. ह्या गोष्टींमुळें डॉ. रॉक्सम ह्यांच्या मृतवत् म्हाताऱ्या—कोताऱ्यां-प्रमाणेंच सबंध हिंदी प्रजा प्रत्यक्ष मरणांतून वाचली; परंतु ती निस्तेज मात्र राहिली. लोकसंख्येला आवाक्यांत ठेवणारे नैसर्गिक उपाय नष्ट झाले, जन्मलेल्या अर्भकांचे प्राण वाचले, पण जग-लेल्या जिवांची काय अवस्था झाली ? लोकसंख्या फुगत चालली. अन्नपुरवठा त्या प्रमाणांत वाढला नाहीं आणि कोट्यवधि लोकां-वर जिवंतपणींच मरणाच्या यातना भोगण्याची पाळी आली. लोकसंख्या वाढत चालली, तरी तिच्या दर्जाकडे दुर्लक्ष झालें. प्राण वाचविल्याबद्दल इंग्रजांना शाबासकी मिळाली, पण त्याच्या अहेतुक दुष्परिणामांची जबाबदारी मात्र आपण आपल्या दैवावर टाकली !

### दुबळ्यांना सुदृढ केलें नाहीं

जगवलेल्या दुबळ्या अर्भकांना व माणसांना सुदृढ करण्याचा प्रयत्न करण्यांत आलेला दिसत नाहीं. दुबळ्यांच्या हातून काम झालें नाहीं, तरी त्यांना खावयास अन्न हें लागतेंच. साहजिकच हिंदी लोकसंख्या व हिंदी अन्नपुरवठा, ह्यामध्यें मोठेंच अंतर पडतें, तें इतकें कीं लोकांना जिवंत राखण्यापुरताहि अन्नपुरवठा होऊं शकत नाहीं. अद्यापहि आपल्या सरकारचें लक्ष अशक्तांचा मृत्यूपासून बचाव करण्याकडेच मुख्यतः आहे; जनतेला सुदृढ, कार्यक्षम करण्याकडे तितकेंसें नाहीं, असें म्हणावें लागतें.

### आरोग्याचा मर्यादित कार्यक्रम

वेगवेगळ्या रोगांनीं माणसाला प्रत्यक्ष मृत्युमुखीं पडूं न देण्या-इतकाच आरोग्याचा मर्यादित कार्यक्रम समाजाच्या अंतिम हितास पोषक होणार नाहीं. जन्मास आलेलें प्रत्येक मूल आपल्या आयुष्याचा अधिकांत अधिक भाग उपयुक्त कार्यास कार्यक्षमतेनें कसें देऊं शकेल, ह्या दृष्टीस अधिक महत्त्व देण्यांत आलें पाहिजे. ह्याचा अर्थ, अन्नपुरवठ्याच्या वाढीबरोबरच लोक-संख्येच्या प्रश्नाकडे गंभीरपणानें लक्ष दिलें पाहिजे. अंधळे पांगळे, लुळे, क्षयी, महारोगी, भिकारी इत्यादींना मारून टाकावें म्हणजे त्यांवर होणारा अनुत्पादक व वाया जाणारा खर्च वाचेल आणि समाजाची आर्थिक शक्ति आज जी अत्यंत मर्यादित आहे ती वाढवितां येईल, असें सुचविणें धाष्टर्याचें होईल. परंतु अनेकांच्या मनांत असा विचार येतो कीं, ज्या प्रजेला स्वतः जगण्याचेंहि त्राण नाहीं, तिचेवर अनुत्पादक लोकांचा हा पडणारा बोजा असह्य होत चाललेला नाहीं काय ? स्वतःचेंच पोट भरूं न शकणाऱ्या अर्धपोटी लोकांवर अशा कोट्यवधि लोकांचें पोषण करण्याची पाळी आज येऊन पडत आहे. निष्क्रिय माणसालाच काय, परंतु आवडत्या म्हाताऱ्या जना-वरासहि जगवून सुखी ठेवतां येण्याचें सामर्थ्य आपणाजवळ परमेश्वरकृपेनें असेल तर उत्तमच; नाहींतर हें दडपण दुःसह होणार नाहीं काय ?

### अन्नप्रश्नाइतकाच महत्त्वाचा प्रश्न

घरांतील बहुतेक सर्वच माणसें बसून खाणारीं असलीं आणि मिळवत्या माणसाची प्राप्ति त्याला स्वतःलाहि पुरत नसली म्हणजे कुटुंबावर जो प्रसंग येतो तसाच कांहींसा प्रसंग आपल्या देशावर व समाजावर ओढवलेला आहे. दर माणशीं, तर ताशीं उत्पादन वाढवून समाजाची एकूण मिळकत वाढल्याविना हा आर्थिक संसार नीट चालू शकणारच नाहीं. ह्या प्रश्नाचा व्यापक, सामाजिक व आर्थिक दृष्टीनें विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे आणि त्याकडे शास्त्रशुद्ध व निर्विकार बुद्धीनेंच पाहिलें पाहिजे, असे विचार आतां मनांत येऊं लागले आहेत. अन्नपुरवठ्याच्या वाढीच्या चिंतेंत असतांना दुबळ्या लोकसंख्ये-च्या वाढीकडे पूर्ण दुर्लक्ष करून व कसेंबसें जगणाऱ्या माणसां-च्या प्रत्यक्ष दुरावस्थेविषयीं उदासीन राहून आणि त्यांना मरणापासून केवळ बचाव करून भागणार नाहीं. आर्थिक व औद्योगिक दृष्टीनें हें परवडण्याजोगें नाहीं.

### उत्पादनशक्तीवर आघात

आयुर्विमा कंपनीला तिचे विमेदार दीर्घायू व्हावयास हवे असतात. विमेदारांना मृत्यु आला तर कंपनी क्लेमचे पैसे देण्यास बांधलेली असते. उलट, विमेदार जिवंत राहिला तर तो कंपनीस हप्ते भरत रहातो. मृत्यूचे अगदीं समीप येऊन अंथ-रुणावर अनेक वर्षे काढणारा रोगी त्याच्या कुटुंबासहि नकोसा

झाला तरी जोंपर्यंत त्याच्यांत जीव शिल्लक आहे तोंपर्यंत कंपनीचें हितच होत असतें. राष्ट्राच्या संसारांत असें घडत नाहीं. समाजावर ज्याचा निष्कारण भार पडतो अशीं माणसें त्याच्या उत्पादनशक्तीवर आघात करीत असतात. तरुणपणीं ज्यांनीं राष्ट्रीय उत्पादनास हातभार लावला, अशांचें म्हातारपण समाजास अनुपकारक होत नाहीं. कारण, म्हातारपण सुखानें जाण्याचा हक्क त्यांनीं प्राप्त करून घेतलेला असतो. म्हातारपण सुखाचें जाईल अशी अपेक्षा नसेल, तर तरुणपणीं कष्ट कोण करील? परंतु जेथें प्रजेचे सर्वच घटक जन्मापासून म्हाताऱ्याप्रमाणें दुर्बल होऊं लागले, अशांचाच भरणा वाढूं लागला, म्हणजे किती तरी कठीण अवस्था निर्माण होते. अन्नपुरवठ्याच्या एकाच बाजूवर लक्ष केंद्रित न करतां या प्रश्नाच्या दुसऱ्याहि महत्त्वाच्या बाबीकडे लक्ष दिलें पाहिजे. त्यांत येणाऱ्या अप्रियतेचा धोका किती काळ टाळतां येईल? नागरिकांच्या उद्धाराचा विचार करतांना त्यांच्याकडे माणुसकीच्या दृष्टीनें पहाणें अगत्याचें आहे, हें खरें आहे. पण या माणुसकीच्या दृष्टीचें स्वरूप व्यापक असावयास पाहिजे. मूलग्राही महत्त्वाच्या या प्रश्नाकडे डोळेझांक करणें देशाच्या अंतिम हिताचें होणार नाहीं.

---

### मध्यम प्रतीच्या धंद्यांसाठी जर्मन भांडवल

पश्चिम जर्मन सरकारचे अर्थमंत्री डॉ. लुडविग एरहार्ड ह्यांनीं भारताच्या औद्योगिक विकासासाठीं अधिक प्रमाणांत मदत करण्याचें आश्वासन दिलें आहे. दिल्ली येथें पत्रकारांशीं बोलतांना ते म्हणाले कीं, आर्थिक साह्य देण्याचा हा व्यवहार सरकारी पातळीवरून करण्यासच जर्मनी उत्सुक आहे असें मात्र नाहीं. मदत करण्याचा सर्वांत चांगला मार्ग म्हणजे मध्यम प्रतीचे धंदे काढणाऱ्या भारतीय उद्योगपतींशीं जर्मनींतील खाजगी भांडवलवाल्यांनीं सहकार्य करणें हा होय. आर्थिक जीवनाचें नियोजन करतांना साचेबंद चौकटीचा आश्रय करण्यांत येऊं नये, ही गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे. खाजगी भांडवलालाहि कमी-अधिक प्रमाणांत मुभा देण्यांत आली पाहिजे. खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांची जोपासना करणें भारताच्या परदेशीय व्यापाराच्या दृष्टीनेंहि जरूर आहे. परदेशांची देणीं देण्याच्या कामीं अडचणी उत्पन्न झाल्यामुळें भारताला कांहीं निर्बंध घालणें सध्यां जरूर झालेलें आहे. पण ते निर्बंध कमी करण्यांत आल्यावर भारताला परदेशी बाजारपेठांत जर आपला माल टिकवून धरावयाचा असेल, तर देशांतर्गत व्यापार-व्यवहारांतहि जोराची स्पर्धा असणें अगत्याचें आहे. जी औद्योगिक प्रगति ५० वर्षांत होऊं शकेल ती त्यापेक्षा फार थोड्या काळांत करण्याची जबाबदारी भारतावर पडली आहे. म्हणून निरनिराळ्या आर्थिक आघाड्यांवर एकदम कामें सुरू करावीं लागत आहेत. ज्या उद्योगधंद्यांत ५० पासून २०० माणसें रोजगारी करूं शकतील असे मध्यम प्रतीचे धंदे भारताला इष्ट असे ठरतील. तथापि, मोठे उद्योगधंदे चालू करण्याचें सरकारचें धोरण बरोबर आहे; आणि हे उद्योगधंदे सरकारी मालकीचे ठेवणेंहि भारताच्या परिस्थितींत योग्य आहे.

## नाणेंबाजारांतील घडामोडींचे बँकांना उद्बोधक धडे

(श्री. वा. पुं. वर्दे)

गेल्या वर्षींच्या देशांतील आर्थिक व चलनविषयक परिस्थितीवर, परकीय हुंडणावळीची चणचण व अंतर्गत द्रव्य उभारणीमधील तूट या द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या पूर्ततेमधील अडचणींची दाट छाया पडली होती. योजनेच्या पहिल्या दोन वर्षांतील खर्च सुमारें रु. १४९६ कोटी किंवा योजनेच्या सुधारून कमी केलेल्या लक्ष्याच्या म्हणजे रु. ४६५० कोटींच्या एकतृतीयांश इतका झाला. विकासयोजनांवरील खर्च १९५६-५७ सालीं रु. ६३७ कोटी होता तो १९५७-५८ सालीं रु. ८६१ कोटींपर्यंत वाढल्यामुळें केंद्र व राज्यसरकारें यांची एकंदर अंदाजपत्रकीय तूट रु. २५० कोटींपासून रु. ५०० कोटींपर्यंत वाढली. चालू वर्षीं, योजनेवरील एकूण खर्च रु. ९६० कोटी असून, अंदाजपत्रकीय तूट सुमारें रु. २२० कोटींपर्यंत खाली येईल अशी अपेक्षा आहे.

योजनेमधील विकासाच्या प्रवेगाचा सर्वांत गंभीर ताण देशाच्या आंतरराष्ट्रीय चलनपरिस्थितीवर पडला व आंतरराष्ट्रीय आयात-निर्यातींतील १९५५-५६ सालच्या रु. १२·३ कोटींच्या नाममात्र शिल्लकीचे १९५६-५७ व १९५७-५८ सालीं अनुक्रमें रु. ३०६·८ कोटी व रु. ३७६·८ कोटींच्या तुटींत रूपांतर झालें. परिणामीं, देशाच्या परदेशी हुंडणावळीच्या गंगाजळींतील रक्कम १९५५ अखेरच्या रु. ८११ कोटींपासून, जुलै १९५८ अखेर रु. ३४७ कोटींपर्यंत घसरली. देशाच्या अंतर्गत चलनाकरतां तारण म्हणून लागणारी किमान रक्कम वजा करतां गंगाजळींतील ही रक्कम केवळ रु. १०७ कोटींपर्यंत झाली आहे असें दिसून येईल. याच्या उलट, जून १९५९ पर्यंतचीं आपलीं आंतर-राष्ट्रीय देणीं रु. २६५ कोटी इतकीं आहेत. देशाचे माजी अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख यांच्या मतें, खाजगी उद्योगपतींनीं केलेली परकीय चलनाची सट्टेबाजी हें या समस्येचें एक महत्त्वाचें कारण होय. तथापि, मित्रराष्ट्रांनीं दिलेल्या कर्ज व अर्थसाहाय्यामुळें, तांतडीच्या अडचणी दूर होऊन या प्रश्नावर दीर्घ मुदतीचा तोडगा काढण्यासंबंधीं विचार करण्यास देशास अवधि मिळेल, अशी आशा वाटूं लागली आहे.

देशांतील अंतर्गत परिस्थितीमध्येंहि गेल्या वर्षीं अनेक विकट समस्यांना आपणांस तोंड द्यावें लागलें. परकीय चलनाच्या चणचणीमुळें आयातीवर घातलेल्या तीव्र निर्बंधामुळें औद्योगिक विकासाची गति कांहींशी मंदावली. खतांची टंचाई व पर्जन्यराजाची अवकृपा यामुळें शेतकी उत्पादनहि बरेंच घटलें. आवश्यक कच्च्या मालाची टंचाई, अन्नटंचाई, भाववाढ, यामुळें जनतेची क्रयशक्ति घटल्यामुळें किंमतवाढीविरुद्ध ग्राहकांची तीव्र प्रतिक्रिया, रोजगारवाढ मंदावली असूनहि मजुरांमधील वाढत असलेला असंतोष, यामुळें कांहीं धंद्यांमध्यें विशेषतः कापडमाल पडून राहूं लागला. या सर्व गोष्टींमुळें मागील वर्षापेक्षा गतवर्षीं आपल्या अर्थव्यवस्थेवरील ताण बराच वाढला व ठराविक उत्पन्नाचा मध्यमवर्ग आणखीच भरडून निघाला. नुकतेच केलेले

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

स्वागतार्ह बदल लक्षांत घेतांहि, देशाच्या करव्यवस्थेसंबंधींच्या धोरणामध्यें विकासाच्या गरजांच्या योग्य जाणीवेचा अभावच दिसून आला व चलनविषयक व बँकांच्या कर्जावरील नियंत्रणें तितकीं परिणामकारक ठरलीं नाहींत. अर्थातच याची जबाबदारी जशी अंशतः नागरीक व राष्ट्र ह्या दृष्टीनें आपणां सर्वांवर आहे तशीच ती अंशतः गुंतागुंतीच्या जागतिक आर्थिक परिस्थितीवरहि आहे, हें उघड आहे.

नाणेंबाजारांतील सद्यःस्थिति, गतवर्षी याचवेळीं असलेल्या परिस्थितीच्या बरोबर उलट आहे असें म्हटल्यास चुकीचें ठरणार नाहीं. १९५६–५७ सालीं, सर्व जगभर भाववाढ व चलनवाढीचें थैमान चालू होतें; व त्यावर उतारा म्हणून सर्वत्र व्याजाच्या दरामध्यें वाढ करण्यांत आली होती. मार्च १९५८ पासून मात्र अमेरिकेंतील आर्थिक मंदीमुळें या परिस्थितींत बदल होऊन व्याजाचे दर घसरू लागले. बँक ऑफ इंग्लंडचा व्याजाचा दर सात टक्क्यांपासून गेल्या पांच महिन्यांत चार टक्क्यांनीं साडेचार टक्क्यांवर आणला गेला आहे. रिझर्व्ह बँकेच्या व्याजाचा दर जरी ४ टक्क्यांवरच कायम असला तरी ठेवीवरील भरमसाट वाढलेले दर मात्र खाली येऊं लागले आहेत. बँकांच्या कर्जावर रिझर्व्ह बँकेनें घातलेलीं तारणविषयक नियंत्रणें व आर्थिक व्यवहारांत एकंदर घट, त्याचप्रमाणें बँकांच्या ठेवीमध्यें झालेली भरपूर वाढ हीं या बदलाचीं मुख्य कारणें आहेत. वृतान्तांचे वर्षी जनतेच्या हातीं खेळणाऱ्या एकंदर चलनामध्यें जरी फक्त रु. ३४ कोटींची वाढ झाली तरी बँकांकडील ठेवीमध्यें रु. २४१ कोटींची वाढ झाली व त्यांनीं दिलेल्या कर्जामध्यें रु. १६ कोटींची घट झाली. याउलट, मागील वर्षी एकंदर चलनामध्यें रु. १५५ कोटी, बँकांकडील ठेवीमध्यें रु. १७२ कोटी, व बँकांनीं दिलेल्या कर्जामध्यें रु. १५४ कोटींची वाढ झाली होती. या बदलामुळें, तरत्या भांडवलासंबंधींची बँकांची सुधारलेली परिस्थिति, सरकारी कर्जरोख्यामधील त्यांच्या गुंतवणुकीमध्यें झालेल्या १५४ कोटींच्या वाढीमध्यें दिसून येतें. याउलट, मागील वर्षी, बँकांना रु. १५ कोटींचे कर्जरोखे विकावे लागले होते.

गेल्या वर्षी नाणेंबाजारांतील घडामोडींपासून बँकांस कांहीं उद्बोधक धडे घेण्यासारखे आहेत. प्रथम म्हणजे, ठेवीकरतां घातक स्पर्धा कधींच किफायतशीर होत नाहीं हें या वर्षी बँकेच्या घटलेल्या फायद्यावरून सिद्ध झालें. दुसरा म्हणजे, व्याजाच्या दरापेक्षा ठेवीदार, बँकांकडून मिळणाऱ्या एकंदर सोयी व सवलतींना अधिक महत्त्व देतात. क्रमशः अर्थसंचय करणाऱ्या सामान्य माणसाच्या बाबतींत तर हें विशेषत्वानें खरें आहे. या वर्गाची व्यक्तिशः बचत जरी थोडी असली तरी एकूण बचत भरपूर असते. बँकांनीं जाहिर केलेले व्याजाचे आकर्षक दर यापेक्षा हा वर्ग, पैशाची सुरक्षितता, पैसे भरणें व काढणें याविषयींच्या सवलती, बँकनोकरांचें सौजन्य, यांस अधिक महत्त्व देत असतो. पैशाची सुरक्षित गुंतवण व ग्राहकांना उपलब्ध होत असलेल्या सोयी–सवलतींच्या बाबतींत लहान बँका मोठ्या बँकांवर मात करूं शकतात. मला असें वाटतें कीं, जरी आपल्या देशांत बँक व्यवसायामध्यें एकंदरींत केंद्रीकरणाची प्रवृत्ति असली, तरी जोंपर्यंत या मूलभूत गोष्टींची लहान बँकांना पूर्ण जाणीव आहे तोंपर्यंत, मोठ्या बँकांच्या स्पर्धेची त्यांनीं तमा करण्याचें कारण नाहीं.

ठेवींमध्यें झालेल्या वाढीमुळें जवळील निधीचा किफायतशीर विनियोग कसा करावा हा प्रश्न बँकांपुढें उपस्थित झाला आहे. आपल्या देशांमध्यें कर्जाऊ पैशाची निकड असलेले हजारों लहान कारखानदार व व्यापारी असल्यामुळें, बँकधंद्याला पुष्कळ वाव आहे. समाजवादी समाजरचना प्रस्थापित करूं इच्छिणाऱ्या देशामध्यें उद्योगधंद्यांचें विकेंद्रीकरण अपरिहार्य आहे. त्यामुळें या क्षेत्रामध्यें बँकांना अजून पुष्कळ प्रगति करतां येण्यासारखी आहे. समाईक भांडवलाच्या छोट्या बँका व नागरी सहकारी बँका यांची वाढ होण्याचें मुख्य कारण हेंच कीं, त्यांनीं कारागीर व लहान उद्योगधंदे यांच्या आर्थिक गरजा पुरविण्याच्या दृष्टीनें आपलें धोरण आंखलें. खूप नफा देणारी पण तोट्याची शक्यता असणारीं थोडींच कर्जे देण्यापेक्षा, अनेक लहान कर्जे देण्यांत धोक्याचें प्रमाण संविभाजनामुळें कमी होतें. हें अजूनपर्यंत छोट्या बँकांचेंच राखीव क्षेत्र होतें. परंतु आतां मोठमोठ्या बँकाहि यामध्यें शिरल्यास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. ब्रिटिश बँकांनीं अलीकडे सवलतीच्या दरानें ५० ते १,००० पौंडांपर्यंत वैयक्तिक तारणावर व्यक्तिगत कर्जें देण्यास सुरुवात केली आहे. या देशामध्यें अशा तऱ्हेच्या उत्पादक कर्जांना एवढें मोठें क्षेत्र मोकळें आहे व ग्राहक वर्ग इतका विविध आहे कीं, सर्वांनाच आपापल्या ऐपतीप्रमाणें कार्य करण्यास पुरेशी संधि मिळूं शकेल.

---

**पाकिस्तानधील उतरत्या किंमती**— पाकिस्तानमध्यें लष्करी कायद्याचा अंमल सुरू झाल्यापासून लोकांना लागणाऱ्या रोजच्या वस्तूंच्या किंमती घटत चालल्याच्या वार्ता येत आहेत. मध्यम व जाडें कापड, खाण्याचीं तेलें, मिठाई, धान्य, इत्यादि मालाच्या किंमती कमी-अधिक प्रमाणांत उतरत आहेत. काळ्या बाजारवाल्यांना कडक शिक्षा जाहीर करण्यांत आल्या आहेत.


**मंदिर सर्वांना खुलें झालें**—भडोच जिल्ह्यांतील शुक्लतीर्थ ह्या ठिकाणीं १,००० वर्षांपूर्वीचें ओंकारेश्वराचें देऊळ आहे. ह्या देवळांत आचार्य विनोबा भावे ह्यांनीं अनेक धर्मांच्या लोकांसह प्रवेश केला व पूजा केली. मंदिराला त्यांनीं विश्वमंदिर असें नांव दिलें असून आतां तें सर्व धर्मांच्या लोकांना खुलें करण्यांत आलें आहे.

**सरकारच्या धोरणाचा परिणाम**—मध्यवर्ती सरकारनें तांदुळाच्या खरेदीसंबंधीं जें धोरण स्वीकारलें आहे, त्याविरुद्ध आंध्र-प्रदेश सरकार तक्रार करणार असल्याचें समजतें. ह्या धोरणामुळें राज्यांतील तांदुळाच्या किंमती चढल्या आहेत व सुमारें १,२०० भातसडीच्या गिरण्या बंद पडल्या आहेत अशी आंध्र सरकारची तक्रार आहे.

**पाकिस्तानांत दारूगोळ्याचा कारखाना**—पाकिस्तानांत झालेल्या राज्यक्रांतीचा त्याच्या परदेशी व्यवहारावर परिणाम झालेला दिसत नाहीं. पाकिस्तानला ब्रिटननें द्यावयाच्या ९० लाख पौंडांच्या कर्जाचा विचार रीतसर चालू आहे. त्याशिवाय रावळपिंडी येथें काढण्यांत यावयाच्या दारूगोळ्याच्या कारखान्यासंबंधीं सल्लामसलत देण्यासाठी ब्रिटिश तज्ज्ञांचें एक मंडळ कराचीला गेलें आहे.

**विक्रीकराची थकबाकी**—३१ मार्च १९५८ अखेर मुंबई राज्यांत विक्रीकराची ६,६२,००० वर थकबाकी होती अशी माहिती विधानसभेंत अर्थमंत्री श्री. जीवराज मेहता ह्यांनीं दिली. मध्यवर्ती सरकारनें मुंबई सरकारला १,५०,०४०० टन तांदूळ स्वस्त धान्याच्या दुकानांतून विकण्यासाठी पुरविला अशीहि माहिती देण्यांत आली.


## कोणाला कशाची
## तर कोणाला कशाची



ह्यांना मुलीच्या लग्नाची काळजी...;



तर ह्यांना मुलाच्या शिक्षणाची...



अन् ह्यांना उतारवयाची...



ह्यांना बायकामुलांची काळजी...



तर शेटजींना इस्टेटीची काळजी...!

या सर्वांचा अर्थ एकच. वेळेला पैशाची जरूरी असते. एकदम पैसा उभा करण्यापेक्षां आतांच थोडा हप्ता भरावयास सुरवात करून एका विशिष्ठ रकमेबद्दल निश्चित राहतां येते. तुमचा विमा विक्रेता तुम्हांला योग्य अशी विमा योजना समजावून सांगेल.

**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया**

सेंट्रल ऑफिस : "जीवन केंद्र" जमशेटजी टाटा रोड, मुंबई-१

PRATIBHA/LIC/ 4.

५०

वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

## ★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

आगामी प्रकाशन

## મધુમાલતીનું સૌંદર્ય

मूळ लेखक :
श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"

गुजराती अनुवादकः
प्रा. शशिन् ओझा, एम्. ए.

प्रस्तावना :
लेडी प्रेमलीलाबेन ठाकरसी
उप-कुलगुरु, श्री. ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ.

## कोलंबो योजनेखाली मिळालेलें तांत्रिक साह्य

### तांत्रिक साह्य मंडळाचा १९५७–५८ चा वार्षिक अहवाल

कोलंबो योजनेंतील तांत्रिक सहकार्य कार्यक्रमानें गेल्या सात वर्षांतील कामकाजांतून सामाजिक व आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी परकीय मदत व राष्ट्रीय प्रयत्न यांची सांगड घालण्याचें एक अतिशय लवचिक पण प्रभावी तंत्र निर्माण केलें आहे. याचबरोबर, केवळ मदत देण्याघेण्यापेक्षा सदस्य–देशांच्या सरकारांच्या व त्यांच्या जनतेच्या स्वाभिमानास नैसर्गिकरीत्या आवाहन करणारी परस्परांस साह्य करण्याची व संयुक्तपणें प्रयत्न करण्याची एक विचारप्रणालीहि या मंडळानें वाढीस लावली आहे.

कोलंबो योजनेचा एक भाग म्हणून हें मंडळ तांत्रिक सहकार्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणींत एकसूत्रता आणतें. १९५१ मध्यें ही योजना सुरू झाल्यापासून जून १९५८ च्या मध्यापर्यंत या विभागास १,००२ तज्ज्ञांचें साह्य देण्यांत आलें असून सदस्य देशांच्या निरनिराळ्या तंत्रविद्याविषयक क्षेत्रांत या विभागांतील ६,८८८ विद्यार्थ्यांच्या प्रगत शिक्षणाची सोय करून देण्यांत आली आहे. १९५७–५८ या एका वर्षांतच १,२६४ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करण्यांत आली व २१० तज्ज्ञ निरनिराळ्या देशांना मदतीस देण्यांत आले. या योजनेनुसार शिक्षणासाठी आणि तज्ज्ञांच्या वापरासाठीं २० लाख पौंडांहून अधिक किंमतीच्या खास साहित्याची तरतूद करण्यांत आली आहे, असें या अहवालांत म्हटलें आहे.

या योजनेनुसार सदस्य देशांनीं डिसेंबर १९५७ पर्यंत ९८ लक्ष पौंड किंमतीच्या तांत्रिक साह्याची तरतूद केली. डिसेंबर १९५६ पर्यंतचा ह्याच आंकडा ६८ लक्ष पौंड होता.

कोलंबो योजनेंतील सदस्य देशांनीं परस्परांस साह्य करणें हें या योजनेचें एक महत्त्वाचें अंग असल्यानें यासंबंधीं मंडळानें व्यक्त केलेल्या मतांस या अहवालांत महत्त्वाचें स्थान देण्यांत आलें आहे. या विभागांतील देश आतां अधिकाधिक प्रमाणांत एकमेकांस साह्य करीत असून त्यामध्यें सदर योजनेच्या खऱ्या सहकारी स्वरूपाचें दर्शन होत जाहे.

१९५७–५८ मध्यें, या विभागांतील देशांनीं त्याबाहेरील देशांस मदत करण्याची एक नवीन घटना दिसून आल्याचें या अहवालांत म्हटलें आहे. या मदतीचें प्रमाण सध्यां अल्प असलें तरी ही एक महत्त्वाची घटना आहे यांत संशय नाहीं.

या विभागांतील ब्रह्मदेश, सीलोन, भारत, इंडोनेशिया, मलाया, पाकिस्तान, सारावाक, सिंगापूर व थायलंड या ९ देशांनीं इतरांस मदत दिल्याचें मंडळानें या अहवालांत म्हटलें आहे. तांत्रिक सहकार्य योजनेनुसार गेल्या ७ वर्षांत ६,८८८ उमेदवारांच्या शिक्षणाची सोय करण्यांत आली. त्यापैकी ९३६ जणांची (एकूण संख्येच्या सुमारें १४ टक्के) या विभागांतील देशांत सोय होऊं शकली.

या अहवालांत सदर विभागांतील देशांतील शिक्षणसोयींत वाढ करण्याच्या आवश्यकतेवर भर देण्यांत येऊन कोलंबो योजनेंत, कोलंबो विभागांतच शिक्षणास साह्य देण्याची अनेक मार्गांची तरतूद आहे असें दाखविलें आहे. या शिक्षणसोयींमुळें सदर संस्था असलेल्या देशांचा फायदा होईल, इतकेंच नव्हे तर त्यामुळें या विभागांतील इतर देशांतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासहि मदत होईल.

कोलंबो योजनेच्या विभागांत इतर अनेक यंत्रणाहि कार्यान्वित असल्यानें अशा यंत्रणांच्या कार्यांत परस्पर सहकार्य राहण्याच्या आवश्यकतेचा ऊहापोह सदर अहवालाच्या एका प्रकरणांत करण्यांत आला आहे. या विभागांतील इतर यंत्रणांत संयुक्त राष्ट्र संघटना व तिच्या खास यंत्रणा व अमेरिकेचा तांत्रिक सहकार्य कार्यक्रम यांचा समावेश होतो. कोलंबो योजनेंत आपल्या प्रयत्नांची अशा इतर यंत्रणांच्या प्रयत्नांशीं सांगड घातली असून अनेक प्रसंगीं ही गोष्ट फारच उपकारक ठरली असल्याचें या अहवालांत अखेरीस म्हटलें आहे.

---

**चंद्राभोंवतीं फिरणारा उपग्रह**—रशिअन तंत्रज्ञांनीं व शास्त्रज्ञांनीं चंद्राभोंवतीं फिरणारा उपग्रह सोडण्याची तयारी पुरी करीत आणली आहे असें समजतें. त्याचप्रमाणें खुद्द चंद्रावर जाऊन तेथून परत पृथ्वीवर येणारा उपग्रहहि ते सोडणार आहेत. उपग्रह यशस्वी होण्यास दर सेकंदाला ११·१ किलोमीटर गति पाहिजे असें त्यांचें गणित आहे.

**गुजरातसाठीं आणखी एक वीजकेंद्र**—गुजरातमधील खेड्यांतून व औद्योगिक शहरांतून विजेची वाढती मागणी येत आहे. ती भागविण्यासाठीं गुजरातमध्यें आणखी एक वीजनिर्मिति केंद्र स्थापन करण्याचा विचार चालू आहे. नवीन केंद्र लुनेज ह्या ठिकाणीं स्थापन होण्याचा बराच संभव आहे.

**अमेरिकेकडून मिळणाऱ्या कर्जाचा उपयोग**—अमेरिकेकडून भारताला १० कोटी डॉलर्सचें जें कर्ज मिळणार आहे त्याचा उपयोग मुख्यत: रेल्वेला लागणाऱ्या पोलादाच्या खरेदीसाठीं करण्यांत येणार आहे. ह्या कर्जाची फेड डॉलर्समध्यें न करतां रुपयांच्या चलनांत करण्याची सवलत मिळण्याचा संभव आहे.

**सार्वजनिक आरोग्याचा अभ्यास**—नागपूर येथें सार्वजनिक आरोग्याशीं संबंधित असलेल्या प्रश्नांचा अभ्यास व संशोधन करण्यासाठी एक मध्यवर्ती संस्था स्थापन करण्याचें कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च ह्या संघटनेनें ठरविलें आहे. मुंबई कॉर्पोरेशनचे स्पेशल एंजिनिअर श्री. एन्. व्ही. मोडक संस्थेचे संचालक म्हणून काम पहाणार आहेत.

**एंजिनिअरिंग कारखान्यांतील कामगार**—इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनलतें दिलेल्या एका निकालामुळें कलकत्त्यामधील सुमारें १ लाख कामगारांना दरमहा १० रुपये अधिक मिळणार आहेत. शहरांतील ७४ कारखान्यांतील कामगारांत मूळ पगारांत व महागाई भत्त्यांत होणाऱ्या वाढीमुळें हा फायदा मिळणार आहे.

**निर्यात वाढविण्यासाठी सल्ला**—पश्चिम जर्मनीचे निर्यात सल्लागार मि. स्टाइटझर ह्यांनीं असा सल्ला दिला आहे कीं, भारताच्या मालाची परदेशी निर्यात वाढविण्यासाठी बाजारपेठांचें विस्तृत संशोधन आणि जोरदार प्रसिद्धि ह्यांचा अवलंब करण्यांत यावा.

**तिरुचिरापल्ली ते कोलंबो विमानमार्ग**—इंडिअन एअर-लाइन्स कॉर्पोरेशननें तिरुचिरापल्ली ते कोलंबो हा विमानमार्ग बंद केला आहे. ह्या मार्गावर रोज विमानें सोडण्यांत येत असत. कांहीं महिन्यांपूर्वी आठवड्यांतून तीन वेळांच ती सोडण्यांत येऊं लागली. सीलोनमधील हिंदी रहिवाशांच्या दृष्टीनें ही गोष्ट फार अडचणीची झाली आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद् वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.